# प्रकरण दुसरे

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची आशयसूत्रे

## -: प्रकरण दुसरे :-

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची आशयसूत्रे

- प्रस्तावना
- महानगरीय कादंबरी : एक संकल्पना
- व्यसनांध नायकाच्या कौटुंबिक जीवनाचे वास्तव
- कादंबरीत येणाऱ्या नातेसंबंधांचे चित्रण
- व्यसनाधीन नायकाची वाताहत
- कादंबरीतील गुन्हेगारी विश्व
- भ्रष्टाचारी समाज व्यवस्थेचे चित्रण
- महानगरीय चाळसंस्कृती आणि दारिद्र्यमय जीवनाचे चित्रण
- समाजकार्य करणाऱ्या सेवाभावी संस्था
- समारोप
- संदर्भग्रंथ

## प्रकरण दुसरे

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची आशयसूत्रे

**प्रस्तावना** :

' कादंबरी ' या वाङ्मय प्रकाराचा विचार करत असताना. आपणास तिच्या विविध घटकांचा विचार करावा लागतो. त्यामुळे आपण मागील प्रकरणात ' कादंबरी ' या वाङ्मय प्रकाराचा विस्ताराने विचार केला. या प्रकरणात आपणास प्रस्तुत कादंबरीचा आशयसूत्रांचा अभ्यास करावयाचा आहे. कारण कोणतीही कादंबरी म्हटली की, तिला विशिष्ट असा आशय असतो. ' आशयसूत्रे ' हादेखील कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक असल्याने. या कादंबरीचा आशयाच्या दृष्टीने विचार करणे उपयुक्त ठरते. कोणत्याही कादंबरीला एक मुख्य आशयसूत्र असते. त्या आशयाच्या अनुषंगाने गौण आशयसूत्रे ही त्या कादंबरीतून येत जातात.

साहित्यकृतीचा आशय हा पात्रे, काळ, स्थळ, घटना, प्रसंग, वातावरणनिर्मिती, भाषा इत्यादींच्या घटकांनी मिळून झालेला असतो. जरी कोणत्याही साहित्यकृतीचे आशयसूत्र एकच असले, तरी त्या आशयसूत्रांचे घटक आणि त्याच्या संयोगामुळे कादंबरीत आशयसूत्र विविध रूपांनी उदयास येतात. यालाच गौण आशयसूत्र संबोधता येऊ शकते. या आशयसूत्राची व्याख्या वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशात पुढील प्रमाणे करण्यात आली आहे. " एखादी स्थूल अथवा व्यापक विचारप्रणाली, कल्पना अथवा संकल्पना, अनुभूती किंवा तत्त्व म्हणजे साहित्यकृतीचे आशयसूत्र ते साहित्य कृतीतील सर्व घटकांना तपशिलांना जोडणारे असते "[१]

प्रस्तुत कादंबरीचा आशयाच्या दृष्टीने विचार करताना आपणास कादंबरीत आशयाचे विविध स्तर जाणवतात. या कादंबरीत मध्यमवर्गीय कुटुंब कथा आलेली आहे. या कुटुंबात कादंबरीचा नायक, त्याची आई ( माई ), त्याचे वडील ( दादा ), त्याची बायको ( सुखदा ), मुलगा ( सुकुमार ) त्याचा सावत्र भाऊ ( राघव ) आणि राघवची बायको अशा नातेसंबंधाचे चित्रण येते. तसेच महानगरीय चाळसंस्कृतीच्या दर्शनाबरोबरच लेखक तिथल्या दारिद्र्यमय जीवनाचेही चित्रण या कादंबरीतून करतात. तसेच या कादंबरीच्या आशयात भर घालते ते म्हणजे महानगरातील भ्रष्ट

जीवन व्यवस्था आणि गुन्हेगारी विश्व. या कादंबरीचा नायक दारूच्या व्यसनाने ग्रासलेला असल्याने त्याच्या जीवनाची झालेली वाताहत वाचकांच्या मनाचा ठाव घेते.यासर्व आशयसूत्रांचा विचार या प्रकरणातून करावयाचा आहे.

एकूणच सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या लेखनाचा विचार करता आपणास असे लक्षात येते की, त्यांचे लेखन नगरीय सांस्कृतिक व सामाजिक जडणघडणाशी निगडित आहे असे म्हणावे लागते. त्यामुळे मराठीतील जेष्ठ समीक्षक म.द. हातकणंगलेकर त्यांच्या विषयी लिहितांना म्हणतात की, " सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या लेखनाला आवेग, काव्यत्मकता, अनोखे प्रसंग, पात्रांची गुंफण, त्यामागे आलेली अतर्क्य शक्तीच्या प्रभावाची सावली, निवेदनाच्या अंतरंगात संस्कृत अर्थगर्भ वचनांच्या, ग्रामीण गीतांच्या, अभंग - ओव्यांच्या, गझल, आधुनिक चित्रपट गीते, स्त्री गीते यांच्या झुलणाऱ्या ओळी, महानगरातील घृणास्पद अधोलोक आणि तिथले बेवारशी, व्याधीग्रस्त जीव, जीवाणू यांचे जहरी, विव्हळ जगणे, यांचे एक अभद्र रसायन ते उकळतात. त्याचबरोबर एक अभिजात नैतिक परंपरेची आणि निष्ठांचे भानही ते जागे करतात."[२]

म्हणजेच रिसबूड यांचे साहित्य हे विविध अंगांनी कशाप्रकारे जन्मास आले आहे याच्या विषयीचे मत हातकणंगलेकरांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या लेखनाविषयीचे व आशयाची विविध वैशिष्टये यातून व्यक्त केले आहेत. याचा प्रत्यय आपणास या कादंबरीतून येतो. कारण ही कादंबरी मुंबई महानगरातील ' विलेपार्ले ' या उपनगराच्या स्थल काल सापेक्ष अशा समाज घटकाच्या अनुषंगाने विकसित होत जाते. म्हणजेच या कादंबरीत मुंबई महानगरातील सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा वापर करून विकास घडविला आहे.

म्हणजेच एका अर्थाने ही कादंबरी ' महानगरीय कादंबरीत ' मोडते महानगरातील विविध वैशिष्टये या कादंबरीत आशयसूत्र म्हणून येतात. ' महानगर ' हे या कादंबरीचे केंद्रबिंदू आहे. महानगर या वर्तुळाभोवतीच तिचे कथानक फिरत राहते. त्यामुळे या कादंबरीच्या आशयाचा विचार करण्याआधी आपणास महानगरीय कादंबरी ही संकल्पना समजून घेणे अधिक उपयुक्त ठरेल.

## महानगरीय कादंबरी : एक संकल्पना :-

स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी अनेक दिशांनी विकसित होत होती. ती वास्तवाचा नव्याने अर्थ शोधत होती. यामुळे वास्तववाद अनेक अंगानी विकसित आणि बळकट होत होता. ग्रामीण, दलित जीवन चित्रणाबरोबरच मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रणही कादंबऱ्यातून येत होते. महानगरीय मध्यमवर्गीय जीवनातील ताणे - बाणे, एकाकीपणा, असुरक्षितता, हतबलता यांचा वेध अनेक कादंबरीकार घेत होते. याचे कारण म्हणजे महानगरातील वाढते उद्योगीकरण, कारखानदारी, वाढती लोकसंख्या, शिक्षणाचा प्रसार, जुन्या उदयोग धंदयांची पडझड इत्यादी निमित्तांमुळे महानगरीय लोकसंख्या वाढून छोटया - छोटया शहरांचे अनेक उपनगरे मिळून महानगरात रूपांतर होऊ लागले. त्यातूनच अनेक समस्याही निर्माण होऊ लागल्या. महानगरात उच्च वर्गीयांपासून मध्यमवर्गीय आणि झोपडपट्टीपासून भिकाऱ्यांपर्यंत अनेक प्रकारचा समाज उदयास येऊ लागला. या समाजाला दैनंदिन जीवनात जगतांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागले. त्यामुळे या समाजाची शारीरिक आणि मानसिक स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे चित्रण अनेक लेखक आपल्या साहित्यातून करु लागले. या समस्यांचे अत्यंत विदारक असे कथानक वाचकांच्या मनाचा ठाव घेऊ लागले. आणि म्हणून महानगरीय कादंबरी ही लोकप्रिय ठरू लागली.

महानगरीय कादंबरीला मराठी वाङ्मयात रुजविण्यात व तिची लोकप्रियता वाढविण्यात अनेक लेखकांनी महानगरीय कादंबऱ्याचे लेखन करून मोलाचे योगदान दिले. या लेखकांचा विचार केल्यास प्रामुख्याने पुढील लेखकांची नावे आपल्या लक्षात येतात. भाऊ पाध्ये, मनोहर शहाणे, जयवंत दळती, श्री. ना. पेंडसे, मधु मंगेश कर्णिक, मनोहर तल्हार, मधू साबणे, रघू दंडवते, मनोहर ओक, रमेश मंत्री, अरुण साधू, सुभाष भेंडे, ह.मो. मराठे, रंगनाथ पठारे, अंबिका सरकार, आशा बगे, रोहिणी कुलकर्णी आणि सुमेध वडावाला ( रिसबूड ) इत्यादी लेखकांनी महानगरीय कादंबरी लेखनात मोलाची भर घातलेली आहे. यांच्या लेखनातून महानगरीय जीवन चित्रित झालेले आहे.

म्हणजेच महानगरीय जीवनातील समस्या, तेथील लोकांची जीवन जगण्याची धडपड, त्यांना असलेले उच्चभ्रू संस्कृतीचे आकर्षण, लैंगिक संबंधातील मुक्त व्यवहार, दारिद्रयमय जीवन, जगण्यातील असुरक्षितता, वेश्या व्यवसाय, स्वार्थी व भ्रष्टाचारी वृत्तीचे चित्रण, चाळसंस्कृतीचे जीवन, वाढती गुन्हेगारी वृत्ती, मध्यमवर्गीय कुटुंबाचे नातेसंबंधांचे दर्शन, व्यसनाधीनता इत्यादी समस्यांचे चित्रण महानगरीय कादंबऱ्यातून येऊ लागले आहे. या दृष्टीने आपणास प्रस्तुत कादंबरीचा अभ्यास करावयाचा आहे.

**व्यसनांध नायकाच्या कौटुंबिक जीवनाचे वास्तव** :-

सुमेध रिसबूड यांची ' देह जावो अथवा जावो ' ही कादंबरी वास्तवपूर्ण कादंबरी आहे. तिचे कथानक महानगराच्या पार्श्वभूमीवर साकारते. या कादंबरीतून लेखक मध्यमवर्गीय कुटुंब कथा चित्रित करतात. तसेच या कुटुंबातील नातेसंबंधांचे दर्शन या कादंबरीतून घडवितात. ' नृसिंह ' हा या कादंबरीतील नायक असून शाळेत अत्यंत हुशार असतो. परंतु गरिबीमुळे त्याला पुढील शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्यामुळे त्याचा सावत्रभाऊ राघव नृसिंहाची शिक्षणाची जबाबदारी घेण्यास तयार असतो, एवढेच नव्हे तर नृसिंहाच्या शाळेतील शिक्षिका ' आपटेबाई ' या देखील नायकाला पुढील शिक्षणास आर्थिक मदत करण्यास तयार असतात. परंतु माई ( आई ) ती घेऊ देत नाही कारण माईला आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्यास नृसिंहाची गरज वाटते. म्हणून ती त्याला ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला पाठविते. आणि तिथूनच त्याच्या आयुष्याच्या शोकात्मक कथेला प्रारंभ होतो.

या शोकात्मक कथेचा नायक स्वतः एक निवेदक आहे. कारण तो स्वतःची आत्मकथा लिहितो आहे. त्यातून तो आपले दुःख वाचकांसमोर मांडतो आहे. अशा स्वरूपाची निवेदन शैली प्रस्तुत कादंबरीत रिसबूड यांनी वापरली आहे. कादंबरीची सुरुवातच लेखक नायकाच्या आत्मकथेची सुरूवात अशा स्वरुपात करतो. म्हणजे नृसिंह सुरुवातीला असे निवेदन करतो की,

" - माणसाला सर्वाधिक भीती कशाची वाटते ?

- स्वप्नांची !

- स्वप्नांना कशाची भीती वाटते?
- जाग येण्याची !
- जाग येणं, वास्तवाची काळीज कुरतडणारी जाणीव होत राहणं हा जिवंतपणीचा मृत्यू आहे " [3]

अशा नाट्यमय निवेदनाने लेखक कादंबरीची सुरुवात करतो. नायकाची ही आत्मकथा कादंबरीचा एक भाग बनून राहते. नायकाला स्वप्नांपेक्षाही वास्तव जीवन अधिक दु:खमय वाटते, वेदनामय वाटते, एवढेच नव्हे तर ते जीवन खडतरअसेल तर तो एक मृत्यूच आहे.असे नृसिंहाला वाटते.

कादंबरीतील नायक नृसिंह हा विजयनगरातीलं आपल्या दोन खोल्यांमध्ये राहत होता. त्याच्यासोबत आई, वडील, पत्नी, मुलगा, त्याचा सावत्र भाऊ आणि वहिनी इत्यादी मिळून एक कुटुंब राहत होत. त्यांची आर्थिक परिस्थिती मध्यमवर्गीय असल्याने दोनच खोल्या हक्काच्या, त्याच्या कॉलनीतल्या जवळपास सगळयाच बिऱ्हाडांची परिस्थिती गरिबीची, तर काही नुकतेच गरिबी पार करून मध्यमवर्गीय अशा स्थितीत स्थिरावलेले. त्यामुळे एकमेकांविषयीचे प्रेम, आस्था ही गरिबी सोसायला मदत करणारी ठरायची.

नायकाच्या कुटुंबातील प्रमुख व्यक्ती म्हणजे दादा ( वडील ) ते ' बेडेकर शॉपी ' मध्ये कामाला आहेत. तर राघव सरकारी नोकरीत, त्याची बायको एका शाळेत शिक्षिका आहे. माई मात्र कुटुंबाला हाता भार लावण्यासाठी घरीच जेवणाचे डबे तयार करते. यासाठी राघव घरात लागतील तेवढे पैसे पुरवायचा. माई देखील राघव व त्याच्या बायकोची व्यवस्था चोख ठेवायची. पण काही दिवसानंतर राघव स्वतंत्र खोली घेऊन राहू लागल्याने नायकाच्या कुटुंबाची वाताहत होऊ लागते. राघवची विभक्तता ' लिमेटेड ' असली, तरी त्याचा परिणाम नायकाच्या शिक्षणावरही होऊ लागतो. त्यातच माईच्या स्वार्थापोटी त्याला शिक्षण सोडावे लागते. कारण माई म्हणायची - " पुढे शिकत राहून माझ्या हातातील झारा कढई नि पोळया लाटण्याचं काम हयातभर कायम ठेवायचा

विचार आहे की काय ? ' सावत्र लेक पोसतोय माई जोशीणीला, घराला ' असा जगाकडून होणारा उच्चार कायम ठेवायचा विचार आहे? आधी कामाला लाग! झालासना मॅट्रीक पुरे झालं ! "[४]

माईच्या या आग्रहामुळे नृसिंहाला वडिलांसोबत बेडेकर शॉपमध्ये कामाला जावे लागते. तिथल्या नाना लोणच्यांचे, मसाल्यांचे, धणाजिरा पावडरींचे, पिठासाठी भाजल्या जाणा-या कुळथांचे मोहक मधुर वास मोहित करीत असे. बेडेकरांचा हा अतिशय मोठा व्यवसाय त्यामुळे दररोज हजारोंचा व्यवसाय. हे सगळं नायकाच्या मेंदूत भिनू लागलं होतं. त्यातून चपळाई, धारिष्टयही वाढू लागले. माईही याला प्रोत्साहन देऊ लागली. कारण घरातील श्रीमंती वाढविणे तिला गरजेचे वाटते. म्हणून नृसिंह या शॉपमधून दररोज नोटांची चोरी करु लागला.

परंतु नृसिंह ' रंगेहात ' पकडला जातो. आणि त्याचं बेडेकरमधलं काम संपतं. दारूची सवय आणि दररोज बेडेकर शॉपमध्ये टॅक्सीने जाणं. यामुळे तो आधिकाधिक मोठया चो-या तिथे करू लागला होता. याच दरम्यान त्याचे सुखदाशी लग्न होते. तिला देखील चोरीचा आणि दारूचा त्रास सहन करावा लागतो. तरीपण ती मिटल्या तोंडी अशीच राहिली होती. हे जणू तिने मान्य केले होते. या संसारी जीवनात त्यांना एक मुलगाही होतो. परंतु ' बेडेकर शॉप ' मधून हाकलून दिल्यानंतर नृसिंह दुसऱ्या कामधंदयाची अथवा नोकरीची शोधा - शोध करीत नाही. त्यामुळे माईचे बंद झालेले डबे पुन्हा सुरू करावे लागतात. याला सुखदाचीही मदत होते. राघव व त्याची बायको हे दोघेही वेळोवेळी आर्थिक मदत पुरवितात. या मदतीला माई उपकार न मानता ते त्यांचे कर्तव्य आहे असे म्हणते - " केलंनी म्हणून काय झालं ? राघवच्या हागण्यामुतण्याचं काम मीच केलय. जन्मदात्रीचं थोबाड आठवतंय का विचारा त्याला ! मी डबे देत होते म्हणूनच तो शिकूशकला. आता घरातले डबे त्याने भरुन दिले तर काय बिघडलं ? "[५]

माई नृसिंह आणि राघव यांच्यात भेदभाव करीत असे. स्वतःच्या मुलाविषयी तिची स्वार्थी वृत्ती होती. त्यामुळे राघवच्या कोणत्याही कामाचे तिला कौतुक नसे. त्याने सर्व जबाबदा-या, कर्तव्य म्हणून कराव्यात असा तिचा आग्रह होता. ती नृसिंहाला वेळोवेळी पाठीशी घालत असे. त्याचं व्यसन वाढत जाते. अन्न, निवारा यापेक्षाही दारु प्रिय वाटते. त्याचे कुटुंबाकडे पूर्ण दुर्लक्ष

होते. एकमेकांत अंतर निर्माण होते, आत्मीयता कमी होत जाते. राघव व नृसिंह एकमेकांना भेटत असले तरी संवाद हे औपचारिक स्वरूपाचे होतात. म्हणजेच नृसिंहाच्या मुलाच्या साखरपुडयाचे लाडू असे न सांगता राघव त्याला ते दुकानातून आणलेत असे सांगतो. तो म्हणतो -
" कोलडोंगरीला वाटेत एक नवं दुकान दिसलं. घरगुती पदार्थांचं मेथीचे लाडू भाजल्याचा वास येत होता. ते तयार होईपर्यंत अर्धातास थांबावं लागलं. तुला मेथीचे लाडू फार आवडतात म्हणून थांबलो "[६]

राघव नृसिंहाला वेळोवेळी भेटून खाण्याचे पदार्थ अथवा लागणारे पैसे देत असला तरी आपले रस्त्यावरचे जीवन कधीच संपणार नाही. आपले आयुष्य हे रस्त्यावरच जाणार याची नृसिंहाला खात्री असल्याने दुःख होत असे. या रस्त्यावरच्या जगण्यात अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागल्यामुळे दारू हीच त्याला जवळची वाटायची. या व्यसनामुळे कुटुंबाची होणारी वाताहतीच्या दुःखामुळे तो अस्वस्थ होतो. सुखदा आपल्याला सोडून माहेरी निघून गेली. तेव्हा सुकुमार चारच वर्षाचा होता. त्याचा नाजूक चेहरा त्याच्या लक्षात राहतो.या बरोबरच त्याला स्वतःच्या बालपणच्या घटनाही आठवतात. नृसिंह शाळेत असताना आपटेबाई सर्वांना सहलीला येण्याचाआग्रह धरतात. त्यामुळे सर्व मुलांबरोबरच नरसूलाही सहलीला येण्याचे सांगतात परंतु परिस्थिती गरिबीची असल्याने त्याला दादा नकार देतात. समजावण्यापलीकडे तो हट्ट धरतो, त्यावेळी माईने आदल्याच दिवशी दुकानातून विकत आणलेलं लुगडं काही तरी कारण दाखवून परत केल्याचे त्याला आठवते.

त्यानंतर मात्र ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला लागून त्याने चोरीतून बरेच पैसे कमवायला सुरुवात केली होती. याचा सुखदाला नेहमी राग येत असे, ती त्याला दररोज समजविण्याचा प्रयत्न करते. प्रसंगी ती त्याला जवळही येऊ देत नसे. त्यामुळे त्यांचे संबंध संपुष्टात येतात. या गोष्टीचा पश्चाताप म्हणून नरसू आठ दिवस स्वतःला समजावत दारूपासून लांब राहिला होता. पुन्हा त्याचे धंदे सुरू झाले होते व चैनही वाढली होती. म्हणून सुखदा नृसिंहाला म्हणयची - " तुमच्या घरात मी एवढे दिवस काढले आहेत. माहेरी आम्हीही दारिद्र्य पाहिलं होत. पण ते नाहीसं करण्यासाठी तुमच्या माईसारखा विपरीत मार्ग कुणी सुचवला नाही. तुम्ही माईच्या शब्दाने चालणारे आहात हे मी


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

पाहते आहे. हे शेवटचं सांगते. दुसऱ्याच्या वेदना जशा कुणालाही घेता येत नाहीत. बदली करून घेता येत नाहीत. तशी पापंही नाही घेता येत एकाची दुसऱ्याला. तुम्हालाच ती भोगावी लागतील. असल्या लक्ष्मीला जय नसतो. तुम्ही अजूनही सुधारा " [७]

त्यानंतर मात्र दुसऱ्याच दिवशी तो ' रंगेहाथ ' पकडला जातो. नियतीच्या बोलीप्रमाणे सुखदाने सांगूनही न ऐकल्याने हे नशीबी आलं. माई कॅन्सरने जाते. तेव्हा त्याला वाटे की, एक सभ्य माणूस म्हणून आपण पुनर्वसित होऊ, त्यामुळे सुखदा परत येईल, कदाचित जुळून आलेल्या ' विजयनगरा ' तला मुक्काम आणि संसारही सुरळीत होईल. नायकाच्या अशा दिवास्वप्नातूनच लेखक त्याच्या वास्तव जीवनाचे चित्रही रेखाटतात. लग्नानंतर बरीच वर्ष मूलबाळ होत नाही. म्हणून नवस करून झालेला नरसू माईच्या जीवनात सुख कधीच प्राप्त करु शकला नाही. ही शोकांतिका लेखक त्याच्या कौटुंबिक चित्रणातून वाचकासमोर मांडतो. म्हणजेच लेखक त्याच्या नृसिंह या नावावरून जीवनाची स्थिती दर्शवितात. नृसिंह ' हा ना घरात ना अंगणात ' होता. तशीच नायकाची जीवन गाथाही ना घरात दिसते ना घराबाहेरच्या अंगणात. तिला उंब-यावरच राहावं लागतं. हे दुःख पदरी घेऊन नायक या कादंबरीतून वावरताना दिसतो.

## कादंबरीत येणाऱ्या नातेसंबंधांचे चित्रण :-

प्रस्तुत कादंबरीचा अभ्यास करताना आपणास नायकाबरोबरच इतर अनेक व्यक्तिरेखा भेटतात. या सर्व व्यक्तिरेखांचे नायकाशी संबंध असल्यामुळे त्यांच्यामधील नात्यांचे स्वरूप लक्षात घ्यावे लागते. लेखकाने नायकाच्या कौटुंबिक नात्यांबरोबरच इतर नात्यांचेही दर्शन घडविले आहे. नायकाच्या कौटुंबिक नातेसंबंधात त्याचे वडील ( दादा ), आई ( माई ), सावत्र भाऊ राघव, राघवची बायको, नायकाची बायको सुखदा आणि मुलगा सुकुमार इत्यादी येतात. महानगरीय जीवनातील नातेसंबंधाची वैशिष्ट्ये या कादंबरीतून येतात. नायकाविषयीचा त्यांचा दृष्टिकोन लेखकाने संवादातून व निवेदनातून व्यक्त केला आहे. तसेच नायकाच्या कौटुंबिक नातेसंबंधांव्यतिरिक्त इतरही नातेसंबंध या कादंबरीतून येतात. त्यामध्ये नरसूला भेटलेला तुरुंगातील विलक्षण तरुण, अश्विन शेट, आपटेबाई, सोमा, फरेराबाई, भांजेकर सराफ, चिंतन

चहावाला इत्यादी वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखांचा विचार करावा लागतो. यासर्व नातेसंबंधांचे विविधस्तर आपणास या ठिकाणी अभ्यासावयाचे आहेत.

' बेडेकर शॉपमध्ये ' कामाला असणारा नरसू हा विजयनगरातल्या दोन खोल्यांमध्ये राहतो. त्याचे रोजचं येण - जाणं टॅक्सीने असते. अंधेरीहून दादरपर्यंत टॅक्सीने प्रवास करतो. आणि दुकान येण्याच्या आधीच उतरतो. गरिबीची परिस्थिती असतांना चैनी करतो. हे सारे सुखदाच्या आणि तिच्या माहेरच्या लोकांच्या लक्षात आले होते. ही अनाठायी श्रीमंती त्यांच्या लक्षात आली होती. कारण सुखदा ही गरीब घरातली वसईच्या शेतकऱ्याची पोर अंधेरी नगरीत येऊन पडली होती. ती लख्ख देखणी ! निर्मळ डोळयांची ! अशी सुंदर सुखदा नरसूच्या नशिबात आली होती. त्यांच्या लग्नाच्या वेळी टिळक मंदिरात जंगी रिसेप्शन दिलं होतं. विजयनगरापर्यंत वरात काढली होती. तीही गुजराथ्या मारवडयांची असते अशा थाटात घोडयावरून. पाऊल हातावर घेऊन त्याला उतरवलं गेलं होतं. अशा थाटात लग्न लावून दिले असले तरी दारूच्या नशेमुळे व चोरीच्या सवयीमुळे ती वैतागून माहेरी निघून जाते. पुन्हा कधीच परत येत नाही. ती नरसूला अनेकवेळा समजावण्याचा प्रयत्न करते. पण नरसूला या विळख्यातून बाहेर पडणे कधीच शक्य होत नाही.

नायकाच्या बायकोव्यतिरिक्त या कादंबरीत आणखीन इतरही व्यक्ती येतात. त्यापैकी एक म्हणजे दारूचा गुत्ता चालविणारी फरेराबाई, फरेराबाई पाहणा-याला स्वभावाने कडक वाटत असली तरी दयाळू होती. गुत्यावर येणाऱ्या प्रत्येक गिऱ्हाईकाला कधी नाराज करीत नसे. नरसू राहातं असलेल्या ठिकाणापासून रेल्वे फाटक पार करून ती राहात होती. नृसिंह दररोज तिच्या गुत्यावर कसा नि केव्हा जायचा हे त्याचं त्यालाच कळत नसे. पण तो गेल्यावर ती म्हणत असे - " भटा मृत्यूपत्र लिवतोयस काय पेपरावर ? माजी बाकी भी लिहून ठेव. त्येच्यात !नायतं तू मर्शील नि बाकी हयात राहील तशीच "[८]

तिच्या गुत्त्यावरचं वर्षानुवर्षाचं हे चित्र कधीच बदललं नव्हत. तिथे जाणाऱ्याचे आयुष्य ही असंच पिचत जाणार ! वर्षानुवर्ष फरक एवढाच की तिथे फक्त दारू आणि चकणाच बदलत असे. लाकडी टेबल आणि दारुचा कडक गुळमट सुगंध त्या संपूर्ण गुत्त्यात दरवळत असे. पण एकवेळी

नरसूला बदल जाणवला कारण, दाराच्या चौकटीला लावलेली केळी आणि आपल्याला बघितल्यावर न उमटलेल्या कपाळावरच्या आठया याचे त्याला आश्चर्य वाटते. निवेदक म्हणतो, " भटा ये ! मला वाटलं आज तरी येतोस की नाय ? आणि आवळ तळाचा ग्लास भरून तिने टेबलावर ठेवला, दुसरं कुणीच नव्हतं गुत्त्यावर ... मी पिऊ लागल्यावर आज ती निगुतीने गाजर कापू लागली. प्लास्टिकची डिश माझ्यापुढे ठेवून माझ्यासमोर बसली "[९]

तिच्या या आदराचे त्याला आश्चर्य वाटत असले तरी त्याला बरे वाटते. तिच्या लेकीच्या लग्नात सर्वांना बोलवायची इच्छा असताना ती बोलवू शकली नव्हती. कारण तिच्या लेकीला व तिच्या सासरच्यांना यातले काहीच आवडत नव्हते. नरसूला चाकणा म्हणून काजू घातलेला चिवडा देते. आणि दारूचे पैसेही घेत नाही.

फरेराबाईव्यतिरिक्त आणखीनही काही पात्रे या कादंबरीत येतात. त्यांचाही संबंध नायकाशी येतो. यामध्ये ' अश्विनशेट ' सराफ या व्यापाऱ्याचे चित्रण लेखक करतो. आतिशय चांगल्या स्वभावाचा आणि दयाळू वृत्तीचा आश्विन शेट नायकाचा एक आसरा बनतो. कारण नरसू त्याच्या दुकानाच्या पायऱ्यांवर रात्री झोपतो. तसेच नरसू एकदा टायफॉईडने आजारी पडतो तेव्हा चिंतनला काही पैसे देऊन, रिक्षा करून कपूर हॉस्पिटलला ॲडमिट करण्यास सांगतो. आणि घरी राघवला निरोपही पाठवितो. तर राघवच्या बायकोने नरसूच्या हातातील अंगठी बिनबोभाटपणे काढून घेतली होती. म्हणून एके दिवशी भर दुपारी शटर ओढून दुकान बंद करतांना अश्विन शेटनी चांदीची आंगठी हातावर ठेवली. आणि म्हणतो, " आम्ही तुमचे सोनार ! तुझ्या वहिनीचे तिच्या माहेरकडून तर पिढयानपिढयांचे ! नंतर तुमचे जोश्यांचेही सोनार आम्ही...! तिला पैसे देताना एवढे वगळून दिले होते. तसं सांगून सवरून ! नरशा, तुझ्या लग्नाची सगळी खरेदी आमच्याकडूनच झाली होती "[१०]

अशा व्यावहारिक तसेच आत्मीयतेचे व्यक्तित्व असलेले अश्विन शेट यांचे चित्रण या कादंबरीतून येते. नरसूला घरातून काढून दिले असले तरी त्याच्या गरजा तो राहात असलेल्या समाजातील विविध व्यक्तीकडून भागविल्या जातात. तशा रक्ताचे नाते असलेला त्याचा

सावत्रभाऊ राघव त्याच्याकडे लक्ष देतो. त्याला वेळोवेळी पैसेही पुरवितो. त्यामुळे राघवदेखील वाचकांच्या लक्षात राहतो. तो नरसूला बागेत, रस्त्यावर, अश्विन शेटच्या दुकानाच्या पायऱ्यांवर भेटून त्याचे सांत्वन करतो. त्याच्या सुखासाठी काळजापासून धडपडणारा या कादंबरीतला राघव ही एकमेव व्यक्तिरेखा आहे. पण ' आपणास राघव कधीच घरी ये ! ' म्हणून सांगत नाही त्यामुळे नरसूला त्याचा राग येतो. त्याबद्दलचा राग नरसू पुढील प्रमाणे व्यक्त करतो -

" चार दिवसांचा उशीर ? मी तिरकसपणे विचारलं, ते मनावर मुळीच न घेता राघव म्हणाला, चार दिवसांचे पैसे तुला देऊन ठेवले होते ना ? "[११]

असे तुटक संवाद असले तरी राघव नरसुला दारू सुटावी म्हणून ' अल्कोहोलिक ॲनॉनिमस ' मध्ये सात वेळा ठेवतो. पण त्याचा काही उपयोग होत नाही. त्यामुळे नरसूची प्रकृती ढासळत जाते म्हणून राघव त्याला डॉक्टरांकडे जाण्यास सांगतो, तिथे रक्त तपासण्यास सांगतो मात्र नरसूला हा एक उपहास वाटतो. कारण त्याला हे सगळे बोलणे वरवरचे वाटते. त्यात कोणत्याही प्रकारचे प्रेम आढळत नाही. म्हणून नरसू राघवला उपहासाने म्हणतो-

" तपासून घेऊ ? की विकून येऊ ? " याकडे पूर्ण दूर्लक्ष करुन राघव नरसूला समजावतो, " असलं काही बोलूसुध्दा नकोस. रक्त नि किडनी काही फुकट आली नाही. माईने तुझा नऊ महिने भार वाहिला होता. आणि मी जिवंत असेपर्यंत तुझं धड असेल हे मी पाहीन असं वचन तिला मरण्यापूर्वी मी दिलं होत "[१२]

अशा संवादातून नरसू बद्दल राघवची आत्मीयता आपल्या लक्षात येते. त्यांचे एकमेकांविषयीचे नाते कसे दृढ आहे हे आपणास लेखक या कादंबरीतून दाखवितात. अशा कौटुंबिक नात्यांबरोबरच नायकाची काही मैत्रीपूर्ण अशी नाती या कादंबरीतून येतात. त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे ' सोमा ' हा नायकाचा अगदीच जवळचा मित्र होय. ही मित्रमंडळीतील सगळी नाती उल्लेखनीय आहेत. कारण विजयनगरात राहतांना भिल्लू, चिकण्या, सोमा अशी कित्येक रिकामी पोरं होती. हे सगळे मित्र दिवसातून एकदा किंवा दोनदा ' बेडेकर शॉप ' मध्ये रोजच जायचे

आणि नरसूला पैशाच्या चोरीत मदत करायचे असा भागीदारीतला धंदा सुरू झाला होता. त्याचं व्यसनही भागीदारीत सुरू होतं. सोमाने बेडेकर शॉपमधल्या चोरीत सर्वांत जास्त ' भागीदारी ' केली होती. त्यामुळे त्यांच्यात मैत्री अधिकच घट्ट झाली. तर तो नरसूला म्हणतो -

> " नर्शा, तुझ्या तकदीराचं आठवून लय मजा वाटली, म्हंताना हसू आलं "
> त्यावर नरसू म्हणतो - " माझं तकदीर ?ते तर केव्हाच बाटलीत बुडालंय;मजा कसली आलीय कर्माची ? " अशा उदासीन मनोवृत्तीच्या नरसूला सोमा त्याच्या कौटुंबिक वास्तव जीवनाची जाणीव करून देताना म्हणतो -" तुला चांगली खोली होती. विजयनगरात ती तुला लाभली नाय. माई तुला लाभली नाय, बायको अस्सून लाभली नाय. भाव चांगला असून भावजयीनं तुला तो लाभू दिला नाय "[१३]

त्यामुळे नरसूला सोमा अधिक जवळचा वाटतो. कारण आपल्या हिताचं बोलणारं त्याला कोणीही लाभलं नव्हतं, केवळ माईशिवाय तसेच सोमा नरसूला आपल्या मैत्रीखातर कधी कधी खाण्यासही देतो आणि दारूदेखील देतो. विजय नगरातल्या इमारती पाडून त्याठिकाणी दोन मोठे टॉवर होणार असल्याची बातमी सोमाकडूनच नरसूला कळते. त्यामुळे नरसू अस्वस्थ होतो. कारण त्याठिकाणी त्याचा हक्क राहिलेला नसतो.

पोलिस नरसूला चोरीच्या आरोपमुळे तुरुंगात टाकतात. त्यावेळी तिथे नरसूची एका विलक्षण तरुणाशी ओळख होते. हा तरुण श्रीमंत घरातील असल्याने त्याच्या चेह-यावर तेज चमकते व त्याच्या बोलण्यातून तो सुशिक्षित असावा याचा पुरता अंदाज नायकाला येतो. त्याची राहणीमान अत्यंत चकचकीत होत. या तरुणाची आवड म्हणजे कविता करणे, नाटकात काम करणे व भाविष्यात नाटक दिग्दर्शित करणे हे त्याचे स्वप्न असते. त्याने ' सायकॉलॉजी ' या विषयातून एम.ए. केले आहे. परंतु त्या तरुणाला वडिलांच्या इच्छेनुसार मटक्याचा व्यवसाय स्वीकारावा लागतो. त्यामुळे नाराज झालेला हा तरुण मात्र नंतर या व्यवसायात चांगलाच रुळतो. त्यामुळे एक फॉरमॉलिटिज म्हणून तुरुंगात सतत यावे लागते. अशा या तरुणाचा नृसिंहशी परिचय

होतो. व एकमेकांचे विचार जुळतात. त्यातूनच कवितांविषयीची दोघांची आवड निर्माण झाल्याने तरुण नरसूला कवितांच्या भेंडया खेळण्याचा आग्रह धरण्यासाठी म्हणतो की -

"... तुला पाहिल्यावर आज माझ्या मनात वेगळीच इच्छा निर्माण झाली आहे. माझ्या धंदयात तुझ्यासारखी माणसं भेटत नाहीत. कधी कदाचित इथे आल्यावर तर अशक्यच अशक्य ! म्हणूनच तशी इच्छा निर्माण झाली आहे, तयार आहेस तू "[१४]

या तरुणाचे वडील शिक्षणाने ' एल्.एल्.बी ' होते. तेही रीतसर सनद मिळवलेले. सुरुवातीला दोन वर्ष त्यांनी वकिली केली. या व्यवसायात त्यांना फेरीवाल्याप्रमाणे माणसांच्या पाठी लागायला लागायचं. परंतु त्यांच्या अंगात धाडस असल्याने त्यांनी मटक्याचा व्यवसाय सुरू केला. आणि त्या व्यवसायात साम्राज्यही निर्माण केलं. मात्र त्यांच्या काही इच्छा अपूर्ण राहिल्या. त्या त्यांनी पुढच्या पिढीवर म्हणजेच त्यांच्या नातवावर लादण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांनी नातवाला ' बेटिंग किंग ऑफ युनिव्हर्स ' घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालवला आहे. तसेच या तरुणाच्या वडिलांच्या बाबतीत आणखीन काही सांगायचे म्हणजे त्या तरुणाची आई ही अनाथाश्रमात वाढलेली असली तरी तिच्याशी हे मटकाकिंग लग्न करतात. परंतु त्यांचा दृष्टिकोन हा उपकाराचा आहे. त्यांना त्यांच्या मनासारखी बायको हवी असते. आपण सांगू ते तिने ऐकले पाहिजे म्हणून ते अनाथ मुलीशी लग्न करतात. त्या स्त्रीचे नवऱ्याविषयीचे मत लेखक पुढीलप्रमाणे व्यक्त करतात-

" आपल्या नवऱ्याची सतीसावित्री होऊन रहायचं जणू तिच्या आयुष्याचं इतिकर्तव्य होतं. फारसं शिक्षण आणि फारसं देखणं रूप नसूनही कुणी वकील येऊन आपल्याला पसंत करतो. अनाथ महिलाश्रमातून कायमची सुटका करतो. पत्नीचा दर्जा हयातभरासाठी देतो. हेच सावित्री निनावेसाठी अल्टिमेट सद्भाग्य होतं."[१५]

अशा कौटुंबिक नातेसंबंधांचे चित्रण लेखक या कादंबरीतून करतो. या तरुणाला त्याच्या बापाने दत्तक घेतलेले असते. परंतु त्या तरुणाच्या पालनपोषणात कोणताही भेद ते करीत नाहीत. त्या तरुणाला त्याच्या जन्माची कथा सांगून स्वतःविषयीची ओळख करुन देऊन त्याचा बाप त्याला वास्तवतेचे गांभीर्य लक्षात आणून देतो. त्याचं अनाथपण ते त्याला सांगून टाकतात. वडिलांशी



B... ...SAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

जसे स्पष्ट व प्रेमळ नाते या तरुणाचे आहे. तसेच प्रेमळ नाते त्याच्या आईशीही आहे. तीदेखील तिच्या दोन मुलीप्रमाणेच याला तिसरा मुलगा मानते. व समान पालनपोषण करते. म्हणून हा तरुण जेव्हा वडिलांचा व्यवसाय स्वीकारण्यास नकार देतो. तेव्हा ती तीन दिवस अन्न घेत नाही. तिच्या मुलास ती म्हणते -

" जर वडलांच्या धंदयात यायचा तुझा निर्णय नसेल तर मी अन्न घेणार नाही "[१६]

या नात्यांबरोबरच लेखक या कादंबरीत नायकाशी संबंधित एका नात्याचा उल्लेख करतात. ते म्हणजे त्याच्या शाळेतील शिक्षिका आपटेबाई. आपटेबाई या त्याच्या आवडत्या शिक्षिका आणि नरसू देखील त्यांचा आवडता विदयार्थी असतो. मॅट्रिकनंतर त्या नरसूच्या पुढील शिक्षणाचा खर्च करण्यास तयार असतात. परंतु त्यांची नंतर भेटच होत नाही. त्यासाठी आपटेबाई नरसूच्या घरी दोन - चार वेळा निरोपही पाठवितात. पण माई त्याच्यापर्यंत निरोप पोहचू देत नाही. ब-याच वर्षानी जेव्हा त्या पुन्हा नरसूला भेटतात. तेव्हा त्या पार थकलेल्या असतात. त्यांची नजरही क्षीण झालेली असते. त्यांना नरसूच्या भेटीचा अतिशय आनंद होतो. म्हणजेच आयुष्यातील अतृप्त इच्छा पूर्ण होण्याचा आनंद त्यांना प्राप्त होतो. त्या अमेरिकेत मुलाकडे न राहता भारतातच राहतात. कारण त्यांना नात्यापेक्षा माती श्रेष्ठ वाटते. आपला शेवटचा श्वास सुटण्याआधी नृसिंहची भेट व्हावी अशी त्यांची इच्छा असते. कारण त्यांच्या जीवापेक्षही तो अधिक प्रिय होता. नरसूला ' आय.ए.एस. ' झालेली बघण्याची त्यांची इच्छा असते. पण ती पूर्ण होत नाही. तेवढी गुणवत्ता त्याच्याकडे होती. परंतु नरसू पुढे शिकू शकला नाही. याचे त्यांना दु:ख होते.

अशा विविध नातेसंबंधातून ही कादंबरी साकारली आहे. या नात्यातून नायकाविषयी प्रत्येकाचा दृष्टिकोन लेखक मांडतात. म्हणून या कादंबरीचा आशयाच्या दृष्टीने विचार करताना या नातेसंबंधांचा अभ्यास करणे उपयुक्त ठरते.

**व्यसनाधीन नायकाची वाताहत** :-

प्रस्तुत कादंबरीतील नायक ' नृसिंह ' हा दारूच्या व्यसनात गुरफटल्यामुळे खडतर जीवन जगतो. या दारुमुळेच त्यांचे पूर्ण कुटुंब अस्ताव्यस्त झाले आहे. त्याला घरातून बाहेर काढल्यामुळे

पार्ल्यातल्या मार्केटात, रस्त्यावर हिंडत फिरावे लागते. म्हणजेच एका अर्थाने ही नायकाच्या जीवनातील वाताहत आहे. हा या कादंबरीचा मुख्य आशय आहे.नायकाच्या दु:खमय जीवनाचा या ठिकाणी विचार करावयाचा आहे.

माणसाची एखादया शिक्षेतून अथवा गुन्हयातून मुक्तता होऊ शकते. पण नशा ही अशी गोष्ट आहे की, त्यातून माणसाची मुक्तता कधीच होत नाही. याबद्दल नायकाला पूर्ण खात्री आहे. म्हणून नायक असे म्हणतो -

> "...नशा ही आपल्यासह विश्वाच्या अस्तित्वाला काही काळापुरती मुक्ती देता देता अखेरी, माणसाचा ऱ्हास करत राहते. सजेपासून काही काळानंतर माणूस मुक्त होतो. नशेपासून मुक्तता नाही. सर्वस्वाला जोजवता जोजवता सर्वस्वाचा ऱ्हास करणं हेच तिचं काम !"[१७]

अशा विचारांनी त्याच्या मनात घर केल्यामुळे नरसू दारूपासून आयुष्यात विभक्त होऊ शकत नाही. त्यामुळे वीस - एकवीस वर्ष त्याला रस्त्यावरच जगावे लागतं. रस्त्यावरच्या या वास्तव्यामुळे डास, भूक, अस्वच्छता आणि दारूची तल्लफ इत्यादी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. उपाशी पोटी दारू प्याल्याने पोटात आग पेटायची त्यामुळे त्याला भूक अधिकच वैरी वाटायची. तेव्हा चिंतन मारवाडयाच्या सामोशाच्या गाडीकडे त्याचे सतत लक्ष लागायचं. तर कधी नरसूला टिळक मंदिरातील लग्नाच्या कार्यक्रमातील शिल्लक असलेल्या अन्नावर आपली भूक भागवावी लागत असे. काहीही न मिळाल्यास त्याला कचराकुंडीतल्या नासक्या अन्न पदार्थांचाही आधार घ्यावा लागत होता. परंतु नरसूवर अशी वेळ येऊ नये म्हणून त्याचा सावत्रभाऊ त्याला वेळोवेळी पैसे दयायचा. एकदा असेच चिंतनने कचराकुंडीत टाकलेले सामोसे उचलून नरसू खायला लागतो." परंतु ते त्याच्याकडून खाल्ले जात नाही, कारण त्याने ते तिखटपणे पाहत सामोसे उचलले होते. खाल्ल्यावर दातांवर तारा पसरल्या होत्या. तोंड चिकट झालं होत. सोमा म्हणतो तसा ' नाईलाज ' झाला होता "[१८]

अशावेळी नरसूला घरातून हाकलून दिल्याचा क्षण आठवायचा. दारूच्या व्यसनापायी नरसू घरही विकेल अशा भीतीने राघवची बायको त्याला घराबाहेर काढते. आपले घर बायकोच्या नावे

करुन आपल्याला बेघर केले याचे त्याला दुःख होते. त्याला आयुष्याची वीस - एकवीस वर्ष स्टेशनात, बागेत आणि अश्विनशेटच्या दुकानाच्या पाय-यांवर घालवावी लागली. तरी नशेच्या मृगजळामागे नित्य नव्या आशेने त्याचं धावणं काही थांबलं नव्हतं !

या नशेच्या मृगजळासारखा तो जीवनातही एका अर्थाने धावतच होता. त्याला मृत्यूची ओढ लागली. कारण आपले जीवन त्याला व्यर्थ वाटू लागले. समाजाकडून व कुटुंबाकडून आपल्याला तुच्छ लेखले गेले. कुटुंबातील माईव्यतिरिक्त आपणास कोणाचीच सहानुभूती मिळाली नाही. एवढेच काय पण स्वतःच्या मुलाच्या लग्नात आपल्याला जाण्यास परवानगी नाकारली गेली. या सर्वाचा त्याच्या जीवनावर प्रभाव पडतो. तो दुःखी होतो. म्हणून तो आत्मकथेत लिहितो -

" आजचा दिवस विचित्र गेला. स्वतःच्या मुलाचा साखरपुडा झाल्याचं कळल्यावर ज्याला दुःख होतं तो बाप आणि चाळीतल्या स्वःतच्या दोन खोल्याच्या बदल्यात टॉवर मधला फ्लॅट मिळणार ही बातमी कळल्यावर परम दुःख होणारा गृहस्थ अशी स्वतःची ओळख आज मला कळली. ही ओळख क्लेशदायी आहे "[१९]

नरसूला स्वतःची ओळख पटली असली, तरी ती त्याल क्लेशदायी वाटते. त्याचा स्वीकार करायला कोणी तयार नसल्याने रस्त्यावरचं जीवन त्याच्या वाटयाला येते. ओसाड बागेतील लोखंडी पेटाऱ्यातील बांधकामाचे सामान चोरीला गेल्याने नरसूला संशयीत चोर म्हणून पोलीस पकडून नेतात. आणि गुन्हा नसतांना त्याला पोलिसांच्या मारहाणीला व शिव्यांना सामोरे जावे लागते. तुरुंगातही त्याला एक रात्रभर ठेवले जाते. तिथल्या घाणेरडया वातावरणाचा त्याला त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे तो त्याच्याबरोबर असलेल्या तरुणाला म्हणतो की -

" आयुष्यातला पहिलाच मार हा उघडा वाघडा आणि आयुष्यातली पहिलीच पोलीस कोठडी अनुभवलेली ! जे टाळण्यासाठी पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी मी सुखांचं स्टेशन सोडलं, रस्ता गाठला "[२०]

अशा तुरुंगवासाबरोबरच नरसूला अनेक अपमानांना तोंड दयावे लागे. त्याच्या व्यसनाला कंटाळून सुखदा माहेरी निघून गेल्यामुळे त्याला पोरके वाटू लागते. म्हणून त्याला सतत वाटायचं की, या व्यसनातून आपली सुटका प्रत्यक्षात होईल. आणि तिला वचन देऊन आपल्या संसाराला पुन्हा सुरुवात करावी. पण माईचा या गोष्टीला विरोध असायचा, ती म्हणायची खबरदार, जर तिला आणले तर, कारण ती आपल्या मनाने गेली आहे. तशी आपल्या मनानेच परत आली पाहिजे. व्यसनी असला तरी तो आपला नवरा आहे. याची तिला जाणीव असायला हवी. परंतु नृसिंहाला सतत वाटायचे की,

" ...माईचा हा पीळ न सोसवणारा आहे हे ठाऊक असलं तरी आपण रात्रंदिवस अस्खलित नशेत असलो. तरी सुखदाच्या आस्तित्वाची, सहवासाची भूक अशी तीव्र होई की गुत्त्यावरुन ' विजयनगरात ' न जाता थेट बसईला जावं असं वाटत राही. तिन्ही सांजेला ' कातरवेळ ' का म्हणतात याचा अनुभव प्रत्येक संध्याकाळ ' नशीला 'असून ही देत राही. कातरवेळ ही नाही, हिला तर व्याकूळवेळ म्हणायला हवं असं वाटत राही. काळ हे सा-या जखमांवरचं औषध आहे. हे असत्य वाटत राही अशी लखलखती पावसाळी संध्याकाळ आल्यावर जीव नकोसा होऊन जाई "[२१]

या नायकाच्या स्वगतातून लेखक या ठिकाणी कादंबरीच्या आशयाद्वारे नायकाच्या आयुष्यात आलेल्या पत्नीच्या दुरावल्याचे दु:ख वाचकांसमोर मांडतात. ही नायकाच्या आयुष्यातील सर्वात मोठी वाताहत म्हणावी लागेल. कारण त्याच्या व्यसनामुळे त्याला पत्नीच्या सहवासाचे सुख मिळत नाही. हे सर्व तो आत्मकथेत नमूद करतो आहे. कारण आपण गेल्यावर ही कथा सुखदाने वाचावी अशी त्याची इच्छा असते. ही कथा वाचल्यावर आपल्याबद्दलचे तिचे मत बदलेल. आणि मनात प्रेम निर्माण होईल. कारण दारूच्या व्यसनामुळे दिलेली ही शिक्षा नरसूला योग्य वाटत नाही. ते सुटणारं व्यसन आहे. जर सुखदा माहेरी न जाता इथे थांबली असती तर कदाचित आपले व्यसन सुटलेही असते. त्यामुळे आपला संसार व जीवन सुधारून ही वाताहत थांबली असती. असे नायकाला सतत वाटते.

या नशेमुळे नरसूला कुणी हिणवले अथवा शिव्या दिल्यात तरी त्याच्यावर काही परिणाम होत नव्हता. दारू पिणे हाच त्याचा मुख्य उद्देश झाल्याने तिच्यासाठी दररोज रेल्वेफाटक ओलांडून फरेराबाईच्या गुत्त्यावर जाणे हेच त्याचे काम असायचे. दारू पिऊन आल्यावर रेल्वे फाटक ओलांडतांना रेल्वे येत असल्याचे भान त्याला नशेमुळे उरत नव्हते. म्हणून एकदा कुणीतरी रुळावरुन ओरबाडून, फरफटत पलीकडच्या फाटकापाशी आणून रस्त्यावर टाकून आईमाईवरुन यथेच्छ शिव्या देतो. आणि आडव्या कोसळलेल्या त्याच्या ढुंगणावर लाथा ही मारतो. तरी नरसूला शुध्दी येत नाही.

तो शुध्दीवर येतो तेव्हा त्याच्या पोटात भुकेने आगेचा गोळा तळपत असतो. हे जाणून चिंतन त्याला सकाळचा शिळा भात आणि कांदयाची भजी देतो. मात्र खातांना नरसूच्या तोंडभर मुंग्या पसरतात. त्यामुळे पहिल्याच घासाला सर्व फेकून देतो. तेव्हा चिंतन आपल्या मुलास सांगत असलेले पाहून नरसूला वाईट वाटते. चिंतन म्हणतो -

> " तेरा हात चलता नही स्साले ! तो भी तेरा एक काम मैंने कम कर दिया सुबेका चावल और भजीयाँ पडा हुआ था ढेरसारा वे मैं बेवडेके गले मे बांधके आया ! नही तो कचराकुंडीतक जानेको पडता था तेरे को ये बारीशमेसे तेरा काम बचाऊंगा तो भी तू सुधारेगा नहीं क्या ? "[२२]

यातून आपणास नायकाच्या व्यसनाधीन जीवनामुळे झालेली वाताहत लक्षात येते. त्याला कुटुंबातील व्यक्तीकडून हिणवले जाते. तसे समाजातील व्यक्तीकडूनही आदरपूर्वक वागणूक मिळत नाही. त्यामुळे नायकाचे दु:ख हे संपूर्ण व्यसनी लोकांचे दु:ख म्हणून या कादंबरीतून येते. माईला नृसिंह हा लग्नानंतर बरीच वर्ष नवस केल्यांनतर झालेला मुलगा असला तरी, त्याला आयुष्यात सुख लाभत नाही. त्याचं जगण, राहणं हे ना घरात जाते, ना घरातील अंगणात ते उंबरठयावरच जाते. म्हणजेच तो सुखाचा ना पुरता धनी होतो. ना त्याच्या पदरी पराकोटीच दु:ख येते. यातून लेखकाने नृसिंहची जीवनकथा मांडली आहे.

**कादंबरीतील गुन्हेगारी विश्व** :-

सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या प्रस्तुत कादंबरीतून महानगरीय जीवन चित्रित आहे. या कादंबरीतून लेखक महानगरीय लोकांची जगण्याची धडपड चित्रित करतात. त्यात कोणी नोकरी करतो, तर कुणी व्यवसाय, तर काही छोटयामोठया कामातून आपला उदरनिर्वाह भागवितात. परंतु याच महानगरातील एक घटक असाच असतो की, जो चो-या, खून, दरोडे, गुन्हेगारी, मटका व्यवसाय, दारूचा गुत्ता चालविणे इत्यादी प्रकारची गुन्हेगारी क्षेत्रातील कामे करुन सुख आणि पैसा मिळविण्याच्या धडपडीत असतो. या क्षेत्रातील लोकांच्याजीवनाचा लेखकाने वेध घेतला आहे. त्यामुळे ही कादंबरी मुख्य आशयाबरोबरच गुन्हेगारी लोकांच्या जीवनाबरोबर फिरत राहते. याचा विचार करत असताना आपणास कादंबरीचा नायक, त्याचा मित्र सोमा, फरेराबाई आणि तुरुंगातील विलक्षण तरुण व त्याचा बाप या व्यक्तिरेखांचा विचार करावा लागतो. या सर्वांचा आशयाच्या दृष्टीने याठिकाणी आपणास विचार करावयाचा आहे.

' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला लागतांना नरसूला तिथला मालक म्हणाला होता की, ' भटारखान्यातली भांडीसुध्दा घासावी लागतील ' असे बजावून सांगत होता. पण काम मात्र काऊंटरवर उभं राहून गिऱ्हाईकाला माल द्यायचं मिळालं होत. आणि ' दादा जोश्यांचा पोरगा हुशार आहे ' म्हणून काही महिन्यातच कॅशवर उभ राहायचं काम दिलं होतं. गल्ल्यातील नोटांच्या नवेपणाचा वास त्या जीर्ण होईपर्यंत तस्साच मोहक नशाबाज असतो. म्हणजेच त्यांची किंमत तेवढीच राहते. हे अर्थपूर्ण सत्य जसं जसं नायकाच्या मेंदूत भिनू लागलं होतं. तसतशी चपळाई आणि धारिष्टयही माईने दिलेल्या प्रोत्साहनामुळे वाढत चाललं होतं. त्यामुळे त्याची नोटांची चोरीही वाढत चालली होती. अशा प्रकारे नायकाच्या आयुष्यात गुन्हेगारी प्रवृत्तीचा उगम होतो.

नरसू नोटा चोरण्यासाठी वेगवेगळया मार्गाचा अवलंब करतो. म्हणजेच त्याचे मित्र भिलू, सोमा, चिकण्या अशा रिकाम्या पोरांपैकी दिवसातून एकाने किवा दोघांनी मिळून दुकानात जायचे ! आणि खरेदीच्या नावे कमी पैसे देऊन जास्तीचे रुपये परत द्यायचे, तर कधी नरसू बनियनाच्या आत म्हणजे पोटात नोटा कोंबून घरी आणत होता. या गुन्हयामुळे तो रंगेहाथ पकडला जातो. नंतर तो खाण्याचे पदार्थ ( समोसा, वडापाव अथवा भजी ) इत्यादी सहज चोरत असे एवढेच नव्हे, तर

आत्मकथा लिहिण्यास लागणा-या कागदांची देखील तो बच्चूभायच्या दुकानातून चोरी करतो. अशा छोटया - मोठया गुन्हयांची त्याला सवय लागते.

लेखक नायकाव्यतिरिक्त अजूनही काही गुन्हेगारी व्यक्तिरेखा या कांदबरीतून साकारतो. त्यापैकी सोमा ही एक व्यक्तिरेखा होय. सोमा हा नायकाचा मित्र असून तो गुन्हेगारी वृत्तीचा आहे. त्याने नरसूला नोटा चोरण्यास महत्त्वाची ' भागीदारी ' केली होती. सोमाचा गुन्हेगारी व्यवसाय हा कायम स्वरूपी सुरूच असतो. कारण तो खादयपदार्थ ( वडापाव, सामोसा ) गाडीवरून सहजपणे चोरायचा. दारूच्या व्यसनासाठी पैसे मिळावेत म्हणून तो खोटया नोटा बाजारात खपवून गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांपर्यंत मजल मारतो. त्यामुळे त्याला वेळोवेळी पोलिसाचा मार खावा लागतो. एकदा बांधकामावर ' वॉचमन ' म्हणून कामाला असतांना तेथील लोखंड, लूज सिमेंट इत्यादी वस्तू विकायचा तिथेही तो सापडतो. आणि कामावरुन हाकलून दिला जातो. बाजारात जाली नोटा खपवितो तेव्हा सोमा नरसूला सांगतो की -

" सम्बाजी नग्रात नवा धंदा सुरू झाला, तळघरात नोटा छापतात आज ही बोहोनी झाली आपली. लय टाईमपास्न सांगत व्हता नोटा खपवायला, फिफ्टी - फिफ्टी मंदी, डेरिंग होत नव्हतं, आता ही लॉट्री लागली, जशी !"[२३]

नरसू अथवा सोमा यांचे गुन्हे छोटया स्वरूपात असल्याचे आपणास या कादंबरीतून दिसते.परंतु या कादंबरीत लेखक गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारीचे चित्रणही रेखाटतात.या कादंबरीत चित्रित होणारा तुरुंगातील विलक्षण तरुण हा मटक्याचा व्यवसाय करतो. तर त्याचा बाप मटकाकिंग म्हणून पूर्ण महानगरात प्रसिध्द आहे.

तुरुंगातील तरुण मटक्याचा व्यवसाय बापाच्या मार्गदर्शनाखाली त्या तरुणाचा मुलगा म्हणजेच त्या मटकाकिंगचा नातू सहाच वर्षाचा आहे. परंतु त्याला ही त्याच्या आजोबांनी गुन्हेगारीतच करिअर करण्यासाठी प्रशिक्षण सुरू ठेवले आहे. कारण त्या मटकाकिंगला ' दुनियाको झुकानेवाला ' पाहिजे. म्हणून त्याची स्वप्न तो पुढच्या पिढीवर लादतो. आणि अतृप्त स्वप्नांच्या

पूर्तीचं साधन म्हणून तो नातवाकडे पाहतो. त्याला ' डॉन ' रूपात पाहण्यासाठी धडपडतो. याविषयी नरसूला सांगतांना तो तरुण म्हणतो -

> " माय सन इज सिक्स इयर्स ओल्ड! आजच ते ( मटकाकिंग ) त्याला ' ओपन ' आणि ' क्लोज ' म्हणजे काय ते चविष्टपणे सांगत असतात. ' जनता ', ' कल्याण ', ' मॉर्निंग जनता ', ' नाईट जनता ',' न्यू वरळी ', ' मुंबई मेन 'अशा सगळया नावांसह ते मटके फुटण्याची रोजची वेळ माझ्या मुलाला पाठ आहे.' डी.पी.', ' एस.पी.', या टर्मस्चे अर्थ त्याला माहीत आहेत. ' ब्रॅकेट ',' संगम ', ' मोटर पाना ' यांचे गेम तो बाबांबरोबर खेळत असतो...मजा सांगतो, ' रेड ' या शब्दाचा शाळेत सांगितला गेलेला अर्थ दाखविलेला ' लालरंग ' त्याने नाकारला होता आणि ' रेड म्हणजे पोलिस चेकअप् असं हट्टपर्वक सांगत राहिला होता "[२४]

या मटकाकिंगने आपली अतृप्त स्वप्ने नातवावर लादली असली तरी त्याचे गुन्हेगारी विषयीचे मत हे आश्चर्यकारक आहे. कारण त्याला वाटते की, सरकारने स्वतःची लॉटरी सुरु केली. तेव्हाच मटक्यालाही रीतसर परवानगी दयायला हवी होती. कारण किडनी चोरीत जर डॉक्टरांचं रॅकेट सामील होत असेल, तर कोणतीही ' रक्तहीन ' चोरी ही व्यवसायाचा भाग समजायला हवी. म्हणजेच शिक्षकी, डॉक्टरी, बॅकिंग, दुकानदारी, वकिली इत्यादी जसे व्यवसाय मानले जातात. तसेच ' गुन्हेगारी ' हा देखील व्यवसायच समजायला हवा एवढेच नव्हे मटकाकिंग असेही म्हणतो, जरी सरकारने याला परवानगी दिली नाही. तरी समाजाने गुन्हेगारी हा एक व्यवसायच मानायला हवा. अशा प्रकारे तत्त्वज्ञान मटकाकिंग गुन्हेगारीच्या बाबतीत मांडतो.

तुरुंगात नायक आणि विलक्षण तरुण ज्या खोलीत आहेत. त्यांच्याच शेजारच्या खोलीत एक गुन्हेगार आहे. त्या नराधमाने स्वतःच्या सहा वर्षाच्या मुलीवर बलात्कार सारखा अनैतिक स्वरूपाचा गुन्हा केला आहे. परंतु त्या पुरुषाच्या चेहऱ्यावर थोडाफारही खेद उमटलेला दिसत नाही. या घृणास्पद कृत्याचा त्याला अजिबात खेद नाही. अशा या गुन्हेगारी ' बॅकग्राऊंड '

असलेल्या व्यक्तीचे चित्रण या कादंबरीतून येते. या कृत्याचे त्या तरुणाला व नायकाला अतिशय वाईट वाटते.म्हणून तो तरुण म्हणतो -

"... असा कोणता अपराध त्या मुलीचा होता की, नासमज अशा वयात - पोलिस म्हणाले की सहा वर्षाची आहे आणि हा सैतान वर्षभर बलात्कार करत होता. तिच्यावर !...तिचा कोणता अपराध होता की तिच्यावर या अबोध वयात असे बलात्कार व्हावेत ? बापाकडून व्हावेत ? याचे तिच्या भावी जीवनावर न पुसता येणारे असे कोणते परिणाम असतील ? या तिच्या दुर्दैवाइतकं जगात दुसरं मोठं दुर्दैव कोणत असू शकेल ?"[२५]

लेखक प्रस्तुत कादंबरीतून वेगवेगळया गुन्हेगारी व्यक्तींच्या जीवनाचा आपल्यासमोर आलेख मांडतात. त्यापैकीच एक महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे दारूचा गुत्ता चालविणारी फरेराबाई होय. तिला सासरच्या लोकांनी घराबाहेर काढल्यानंतर ती मुंबईत दारूचा गुत्ता चालविते. आणि आपल्या मुलीसह जीवन जगते. परंतु मुलगी उच्चशिक्षित झाल्यावर ती आईला हा व्यवसाय बंद करण्याचा आग्रह धरते. मात्र या धंदयाविषयीचे तिचे मत असे असते की -

"...या धंदयाने मला जगवलं नि आता शिकलेली लेक सांगते हा धंदा सोड! का सोडायचा ? मटका, जुगार, जगाला चालतो. चरस, गर्दचा व्यापार चालतो. थोडं पुढे होऊन हायवेकडे गेलं की गल्लीबोळात बया उभ्या ऱ्हायलेल्या दिसतात धंदयाला, ते चालतं जगाला ! बायका नाचतात ते लेडीजबार चालतात. आणि आमचा गरिबांसाठीचा गुत्ताबंद पाडायचा ? का ? गोरगरिबांना नशा करायचा हक्क नाई ? नशेसाठी त्यांनी कुठे जावं ? आणि आम्ही तरी काय खावं. "[२६]

अशा या तिच्या वक्तव्यातूनअसे जाणवते की, गुत्ता चालविणे हा गुन्हा असला तरी तो जीवन जगण्याचा एक आधार आहे. त्यामुळे समाजातील इतर घटकांना गुत्ता चालविणे गुन्हा वाटत असला तरी फरेराबाईला तो जीवन जगण्याचा आधार वाटतो. म्हणून सुमेध रिसबूड याकादंबरीच्या आशयातून वेगवेगळया गुन्हेगारीचे चित्रण करताना प्रत्येक गुन्हेगारीचा ' गुन्हेगारी ' हा जीवनाचा आधार

असल्याचे नमूद केले आहे. कारण गुन्हा करणे हा महानगरीय जीवनाचा अविभाज्य घटक आहे. त्याच्या आधारेच महानगरातील बरीच जनता आपला उदरनिर्वाह करीत असते. हे या ठिकाणी लेखकाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे आपणास दिसून येते.

**भ्रष्टाचारी समाज व्यवस्थेचे चित्रण** :-

लेखकाने प्रस्तुत कादंबरीतून प्रमुख आशयाबरोबर महानगरीय लोकांच्या स्वार्थी आणि भ्रष्ट वृत्तीचे चित्रण केले आहे. या भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा अभ्यास याठिकाणी आपणास करावयाचा आहे. तसेच प्रशासकीय, राजकीय, महानगरपालिका इत्यादी क्षेत्रात चालणा-या भ्रष्टाचाराचाही अभ्यास या कादंबरीच्या साहाय्याने करणार आहोत. विविध क्षेत्रातील स्वार्थीवृत्तीच्या लोकांचा या कादंबरीत समावेश होतो.

विशेषत्वाने लेखक या कादंबरीतून पोलिस खात्यात चालणाऱ्या भ्रष्टाचाराचे चित्रण करतात. दारू पिऊन नशा करणाऱ्या बेवारस व्यक्तींकडून पैसे वसूल करणारे पोलिस या ठिकाणी चित्रित होतात. कारण हे व्यसनी लोक स्टेशन, बाग, रस्त्याच्याकडेला बसून रात्री अपरात्री दारू पितात. अशा व्यक्तींकडून पोलीस दंडाचा धाक दाखवून पैसे वसूल करतात. त्यामुळे हे गर्दुल्ले पोलीसांना म्हणतात.-

"मग आमी जावं कुठे ? आमालाबी जान नि नशापानी हाय की नाय ?"[२७]

असे म्हणत ते पोलीसांना हिरवी नोट दाखवितात. ती नोट हातात घेऊन पोलिस त्यांना पुन्हा दमदाटी करतात.' येवढयात भागतंय व्हय ' असे म्हणत पैसे वसूल करतात. यावरून लेखकाने पोलीस खात्यातला भ्रष्टाचार कादंबरीच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहचविला आहे.

तसेच लेखकाने एका उदाहरणातून तेलगीच्या मुद्रांक घोटाळयाविषयीचाही उल्लेख या कादंबरीतून केला आहे. म्हणजेच कादंबरीचा नायक नरसू आणि सोमा यांच्या भेटीतून जे संवाद होतात त्या आधारे लेखक हा भ्रष्टाचार वाचकांसमोर मांडतो. त्याविषयी लिहिताना लेखकाने संवादात्मक निवेदन शैली वापरली आहे. ती अशी -

" नर्शा अजून पेपर वाचतोस का रे दुनियाभरचे ?

" हो !का रे ?"

" त्या तेलगीची आठवण झाली. कोन तरी म्हणालं सरकारी स्टयांपात छापून त्यानं लय मजी, लय मजी करोडो कमावले, खरयं का रे ?"

" हो ! " तर पुढे सोमा ईर्शेने म्हणतो.

" करोडोंचा गंडा घालून सर्कारची मारून ग्येला त्येलंगी तरी चालतं त्यांना, पण आमच्या सारक्या इम्मानदाराना हित थेट एन्ट्री देणार नाय "[२८]

अशा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींना शासन होत नाही. परंतु गरीब, छोटया चोऱ्या करणा-यांना, स्टेशनात राहणाऱ्यांना, बागेत राहणाऱ्या व्यक्तींना कोणत्याही छोटया - मोठया आरोपाखाली पकडून त्यांच्यावर गुन्हा नोंदवतात. बेदम- मारतात, तुरुंगात डामतात. जर कोणी सरकारी आधिकारी अथवा राजकीय पुढारी पोलिस स्टेशनला भेट देणार असेल, तर बेवारस व्यक्तींना पकडून तुरुंगात डांबले जाते. केवळ दिखावा म्हणून त्यांच्यावर साधे गुन्हे दाखल केले जातात. अशा विविध स्वरूपाची भ्रष्ट व्यवस्था लेखक या कादंबरीतून चित्रित करतात.

तर हीच पोलीस यंत्रणा खऱ्या गुन्हेगराला वाचविण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न करते याचे चित्रणही या कादंबरीतून येते. तुरुंगातील तरुणाला वाचविण्यासाठी तिथली पोलीस यंत्रणा कार्यरत असते. या तरुणाचा मटक्याचा व्यवसाय आहे. त्यामुळे त्याचा व्यवसाय हा गुन्हेगारी स्वरूपाचा आहे. परंतु केवळ पैशाच्या जोरावर तो सगळया शासन व्यवस्थेला विकत घेतो. सर्व प्रशासकीय, राजकीय क्षेत्रात वेळोवेळी पैसे पुरवितो. आणि आपला मटक्याचा व्यवसाय तेजीत चालवितो. केवळ एक औपचारिकता म्हणून वेळोवेळी तुरुंगात या तरुणाला जावे लागते. तिथे त्याची बडदास्त ठेवली जाते. पोलीस त्या तरुणाला म्हणतो -

" वरून प्रेशर आलं म्हणून दाखविण्यापुरती ॲक्शन घ्यावी लागली "[२९]

अशी औपचारिक कारवाई जरी पोलिसांनी केली. तरी अशा गुन्हेगारांना सोडवायला राजकीय लोक तयारच असतात. म्हणून पोलिसांची गळचेपी होते. कारण वरिष्ठ अधिकारी

त्यांच्यावर कारवाई करायला पोलीसांना भाग पाडतात. असे गुन्हेगार पैशाच्या जोरावर पुढे राजकारणात जाऊन भ्रष्टाचार मार्जावितात. वेळोवेळी ते राजकीय पार्ट्यांना इलेक्शन फंड देऊन आपले स्थान मजबूत करतात. व गुन्हेगारी व्यवसाय वाढवितात. त्यामुळे पोलीस आणि राजकारणी अशा गुंडाना वारंवार पाठीशी घालतात. अशा संबंधातून त्यांच्यात ' गुडविल ' निर्माण होतं.

तसेच लेखकाने या कादंबरीतून इतर प्रशासकीय क्षेत्रातील भ्रष्ट व्यवस्थेचेही चित्रण केले आहे. वीजपुरवठा क्षेत्रातील वीजचोरीची प्रचंड उलाढाल अधिकारी, राजकारणी आणि व्यावसायिक यांच्या संगनमताने वर्षानुवर्षे चालू आहे. आरोग्य विभागातील ' किडनी चोरी ' त डॉक्टरांच रॅकेट तयार झाले आहे, मॅचफिक्सिंगमधला भ्रष्टाचारदेखील चित्रित झाला आहे. शिक्षण क्षेत्रातील वाढत जाणा-या भ्रष्टाचाराविषयी लेखक पुढील प्रमाणे निवेदन करतो.-

> " फार पूर्वी ज्ञानदान हे व्रत होतं. आता ज्ञान ही बाजार मूल्य असणारी, विकत घेता येणारी वस्तू झाली आहे...ज्याला हायक्लास कोचिंग क्लासमध्ये जाऊन ज्ञान विकत घ्यायची इच्छा नसेल त्याला थेट क्वेश्चन पेपर विकत घेता येऊ शकतो. किंवा थेट मार्क विकत घेता येऊ शकतात."[३०]

अशा महानगरातील भ्रष्टाचाराचे चित्रण करताना लेखकाला विविध क्षेत्रांचा आधार घ्यावा लागतो. मग ते, शिक्षण खाते असेल किंवा पोलीस खाते या विविध खात्यात वाढत जाणा-या भ्रष्टाचाराविषयी लेखक समस्या मांडतात. तिथल्या निकृष्ट दर्जाच्या कामाची समस्या ते कादंबरीतून मांडतात. या कादंबरीत तुरुंगाच्या चित्रणातून लेखक, तिथल्या कैद्यांना निकृष्ट अन्न खावे लागते. की जे अन्न कुत्रेही खाणार नाहीत. ते माणसाला खावे लागते. अशा स्वरूपाचे उदाहरण देऊन लेखकाने महानगरात फैलावलेल्या भ्रष्टाचारावर प्रकाश टाकला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**महानगरीय चाळसंस्कृती आणि दारिद्र्यमय जीवनाचे चित्रण** :-

" महानगरातील श्रीमंत आणि झोपडपट्टी या दोघांमधला समाज म्हणजे चाळीत राहणारा मध्यमवर्गीय समाज होय " या समाजातील व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी छोटी - मोठी कामे करतो. आणि आपला संसार चालवितो. परंतु कुटुंबातील वाढत्या संख्येमुळे या समाजासमोर अनेक अडचणी येतात. या चाळीतील अनेक समस्या म्हणजे तेथील अस्वच्छता, भांडणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न इत्यादी समस्यांना येथील समाजाला सामोरे जावे लागते. अशा अनेक समस्यांना वैतागून येथील बहुसंख्य लोक व्यसनाधीन होतात. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची होते. या चाळसंस्कृतीची महानगरात एक वेगळी ओळख असते. परंतु या चाळीतील लोकांच्या जीवनापेक्षाही कनिष्ट, निकृष्ट दर्जाचे जीवन झोपडपट्टीतील लोकांना जगावे लागते. येथील लोकांना उदरनिर्वाहासाठी विविध प्रकारची कामे करावी लागतात. त्यातूनच मुन्हेगार लोक निर्माण होतात. अशा या दारिद्र्यमय जीवनाचे चित्रण लेखक प्रस्तुत कादंबरीतून करतात. साधारणपणे झोपडपट्टीतील लोकांची कामे गुन्हेगारी स्वरुपाची असल्याने यामध्ये चो-या करणे, खून करणे, वेश्याव्यवसाय करणे इत्यादींचा समावेश होतो. अशा या गलिच्छ वातावरणाचा परिणाम तिथल्या लहान मुलांवर होतो.

नरसूला पार्ल्यातल्या रस्त्यारस्त्यावरून हिंडावे लागते. तेव्हा झोपडपट्टीत राहणारी सरला त्याला आसरा देण्याचा विचार करते. ती नरसूला तसे एकदा विचारतेही पण नरसूला तिचा विचार पटत नाही. तिची हायवेपलीकडे झोपडी होती. त्या झोपडीत ती एकटीच राहत होती. त्यामुळे नरसूला ' रखेला ' म्हणून ठेवायची तिची इच्छा होती. परंतु तिच्या झोपडीच्या जागी महानगरपालिकेच्या संडासाचे बांधकाम आल्याने गलिच्छ ठिकाणी राहण्याची वेळ तिच्यावर येते. तरी ती नरसूला म्हणते -

> " तारी जिंदगी बेवारस यवाना छे ! मारा घरे आवो! हम्मेशा माटे ! दवादारुमाटेपण पैसा आपीस हूँ ! चला आज थी !" सरला ही गलिच्छ ठिकाणी राहत असली, तरी शरीराची भूक भागविण्यासाठी नरसूला ती आपल्या झोपडीत आसरा देण्याचा विचार करते. "

मध्यम वर्गीय समाज चाळीत राहत असतो. या समाजाची आर्थिक स्थिती कमकुवत असायची. परंतु या चाळी आधुनिक काळाच्या प्रभावामुळे नष्ट होऊ लागल्या. त्याठिकाणी महानगरातील बड्या बिल्डर लोकांनी नवीन मोठयाच्या मोठया इमारती बांधण्यास सुरूवात केली. त्यामुळे चाळीतल्या लोकांचे राहणीमान व आर्थिक स्थिती सुधारु लागल्याचे चित्र वर्तमानकाळात दिसू लागले आहे. अशा स्वरूपाचे चित्रण लेखक या कादंबरीतून करतो. कारण नायक राहत असलेल्या विजयनगरातल्या समोरासमोरच्या दोन इमारती, तिथली मोकळी जागा, पटांगण या सर्व जागेवर एक मोठा टॉवर उभा राहणार असल्याने त्यांची चाळ देखील लुप्त पावणार असे कळल्यावर नायकाला दु:ख होते, असे चित्रण या कादंबरीतून येते.

महानगरातील दोन ध्रुव म्हणजे एक अतिश्रीमंत उच्चभ्रू समाज आणि दुसरा म्हणजे झोपडपट्टीत राहणारा अत्यंत दरिद्री समाज होय. हे महानगरातील दोन ध्रुव मानले जातात. आजच्या काळात झोपडपट्टीही महानगरातील एक समस्या मानली जाते. येथील समाज अत्यंत गरिबीत आपले जीवन जगतो. त्यामुळे हा समाज वेळप्रसंगी चोरी अथवा त्यापेक्षाही भयंकर अशा गुन्ह्याला बळी पडतो. तसेच इथल्या अस्वच्छतेमुळे आणि गलिच्छ राहणीमानामुळे रोगराईचा प्रसार अधिक प्रमाणावर होतो. इथल्या बायकाही वाट्टेल ते काम करून सांसारिक जीवन जगतात. यामध्ये प्लॅस्टिक गोळा करणे, भंगार गोळा करणे, माती कामावर जाणे, दगड फोडण्यास जाणे इ. प्रकारची कामं इथल्या स्त्रिया करतात. तर काही स्त्रिया शरीरविक्रय करून पैसा कमवितात. याचा परिणाम इथल्या लहान मुलांवर होतो.

एका झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या जीवन पध्दतीत भिन्नता आढळते. कारण या झोपडपट्टीत एका बाजूला शरीरविक्रय करून पोट भरणा-या ' स्त्री 'चे दर्शन घडते तर, काबाडकष्ट करणाऱ्या ' स्त्री 'चे दर्शनही लेखक घडवितो. म्हणजेच छोटी-मोठी कामं, व्यवसाय अशा प्रकारचे काम करणाऱ्या बायकाही या झोपडपट्टीत राहतात. तर काही बायका फुलं, गजरा, शेंगदाणे-चिरमुरे विकून आपला संसार चालवितात. त्यापैकीच एक गजरा विकणारी, नायकाला ती दरारोज दिसत असते. तिची गजरा विकण्याची जागा ठरलेली असल्याने तिचे स्वत:चे एक अस्तित्व निर्माण

झालेले आहे. या कादंबरीतून एक - दोन वेळा येत असली तरी गजरावाली म्हणून ती वाचकांच्या लक्षात राहते.

**समाजकार्य करणा-या सेवाभावी संस्था** :-

महानगरातील सांस्कृतिक जडणघडणीत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थाच आपले योगदान देतात. या संस्था सामाजिक जीवन सुसह्य करण्यासाठी झटत असतात. कारण महानगरातील अनेक समस्यामुळे हे जीवन जखडले जाते. अशा या जखडलेल्या जीवनाला गती देण्याचे कार्य या संस्था करीत असतात. लेखकाने प्रस्तुत कादंबरीतील व्यसनी, गर्दुल्ले यांचे जीवन सुकर व्हावे म्हणून कार्य करणाऱ्या काही सामाजिक व धार्मिक संस्थांचे चित्रण या कादंबरीत केले आहे. अशा सामाजिक संस्था या महानगरीय जीवनाचा एक हिस्सा बनलेल्या दिसतात. म्हणजेच या संस्था बेसहारा लोकांचा सहारा बनतात.

महानगरातील व्यसनी, गर्दुल्ले लोकांच्या समस्या गंभीर स्वरूपात रूप धारण करत आहे. हे गर्दुल्ले नशेसाठी अनेक मार्गांचा अवलंब करतात. त्यातूनच त्यांना अनेक रोग जडतात. अशा गर्दुल्ल्यांना लवकर मृत्यूला सामोरे जावे लागते. लेखकाने प्रस्तुत कादंबरीत नायकाचे चित्रण करतांना ' एक व्यसनी तरूण ' असेच केले आहे. दारूमुळे त्याचे जीवनही दु:खमय झाले आहे. बेवारस म्हणून रस्त्या रस्त्यावरून हिंडत फिरावे लागते. त्याचे दारूचे व्यसन सुटावे म्हणून नरसूचा सावत्र भाऊ राघव अनेक वेळा प्रयत्न करतो. परंतु नरसूचे दारूचे व्यसन सुटत नाही.

त्यासाठी राघव नरसूला अनेक वेळा ॲल्कोहोलिक ॲनॉनिमस या ख्रिश्चन धर्माच्या लोकांनी चालविलेल्या संस्थेकडे घेऊन जातो. येथील कॉन्सेलर नरसूचे व्यसन सुटावे म्हणून प्रयत्न करतो. वेळोवेळी त्याला मार्गदर्शनही करतो की जे जीवनात उपयुक्त आहे. अशा या कॉन्सिलरने मार्गदर्शन अतिशय मार्मिकपणे केल्याचे दिसते. तो नरसूला म्हणतो -

> " तुमच्या शरीरावर पिण्याचे दुष्परिणाम होतात. तसे आत्म्यावरीही होत असतात. तुम्ही तुमचे सत्व गमावत असतां. संसाराची धुळधाण नाही केवळ, तर प्रत्येक नात्याची धुळधाण करत असतां तुम्ही. "[३२]

या संस्थेचा कॉन्सिलर असे पोटतिडीकीने सांगत असला तरी नरसूचे व्यसन सुटत नाही. त्यासाठी त्याला एक महिनाभर ' आल्कोहोलिक ॲनॅनिमस ' मध्ये ॲडमिट करून घेतात. परंतु नरसू तेथेही दारू पिणे टाळत नाही. त्यामुळे चर्चची शिस्तभंग होते आणि म्हणून नरसूला तेथूनही परत पाठविले जाते.

व्यसन न सुटू शकणाऱ्या गर्दुल्ल्यांसाठी काम करण्यासाठी महानगरात अनेक संस्था कार्यरत असतात. या संस्था गर्दुल्ल्यांचे व्यसन सुटावे म्हणून प्रयत्न करतात किंवा बेवारशांचा आसरा होतात, त्याचे संगोपन करतात. वर्तमानपत्रातील बातमीच्या माध्यमातून लेखक या संस्थेचा परिचय करून देतात. त्या बातमीच्या शेजारी एक फोटोही छापलेला असतो. त्यात गर्दुल्ल्यांच्या पायावरची जखम कोणी तरुणी बांधत होती. म्हणजेच ' मलमपट्टी ' करीत होती, असे दाखविण्यात आले होते. आणि त्याच्या शेजारी एका कोपऱ्याला ' शतदा प्रेम करावे sss ' असं शीर्षकही दिलेलं असते.

लेखकाने या कादंबरीच्या आधारे महानगरातील ' बेटर लाईफ फॉर दि नाकोटिक्स' या संस्थेचा परिचय करून दिला आहे. या संस्थेतील स्वयंसेवक रस्त्यारस्त्यावरचे, रेल्वेस्टेशनातले, रुळातले गर्दुल्ले त्यांचे अड्डे शोधून काढत होते. त्यांच्याशी मित्रत्त्वाचे नाते जोडत होते. अशा गर्दुल्ल्यांची समाजाने हेटाळणी केली असली तरी संस्था मात्र त्यांना अन्न, औषधे पुरवत होती, कपडे देत होती. नशेसाठी एकमेकांच्या सुया वापरू नयेत म्हणून संस्था त्यांना सुयाही पुरवत होती. अशी काळजी घेत ही संस्था कार्य करीत होती.

" बेसहारा अवस्थेत जगणारे गर्दुल्ले, शिरांतुन इंजेक्शेन घेणारे नशाबाज हे रक्त संसर्गामुळे एडस्ग्रस्त होतात. कागद, कचरा, भंगार गोळा करून ते पैस मिळवतात. त्यासाठी धडपडतांना त्यांना होणा-या जखमा तशाच ओल्या-उघडया राहतात. समाजाच्या नाराजीचं, रागाचं कारण होणाऱ्या गर्दुल्ल्यांची व्यसनमुक्ती तर अशक्यप्राय असते. हे ओळखून त्यांनी व्यसनाची किमान पातळी ठेवावी, स्वतःचं किमान एवंढ आरोग्य त्यांना जपता यावं, त्यांचं जिणं थोडफार

सह्य करून स्वत:च्या जगण्यावर ' शतदा प्रेम करावे ' यासाठी धडपडणा-या बी.एल.एफ.एन. या संस्थेची तपशीलवार माहिती होती. "[३३]

अशा या संस्थेच्या कार्याचा आढावा घेत लेखक या कादंबरीतून समाजासाठी झटणा-या संस्थांच्या कार्याचा परिचय वाचकांना करून देतात. या कादंबरीच्या मुख्य आशयाला जोडूनच लेखक या संस्थेच्या कार्याचा उल्लेख या कादंबरीतून करतात. म्हणून आशयाच्या दृष्टीने या कादंबरीतील ही संस्था अतिशय उपयुक्त ठरते.

**समारोप** :-

या प्रकरणांतून आपण ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीत आलेल्या विविध आशय सूत्रांचा अभ्यास केला. प्रस्तुत कादंबरीत सुमेध रिसबूड यांनी मुख्य आशयसूत्रांबरोबर इतरही गौण आशयसूत्रे मांडली आहेत. ह्या आशय सुत्रांचा आपण याठिकाणी विस्ताराने अभ्यास केला. ही कादंबरी महानगरीय जीवनावर प्रकाश टाकते. त्यामुळे या कादंबरीतून प्रामुख्याने आलेली आशयसूत्रे महानगरीय जीवन व संस्कृती यांना अगदीच जवळची अशी आहेत. प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने महानगरातील विविध समस्यांचा वेध घेतला आहे. तसेच याठिकाणी आपण आशयसूत्र म्हणजे काय ? याची व्याख्या बघून महानगरीय कादंबरीच्या संकल्पनेविषयी विश्लेषणात्मक विचार केला.

सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांची ही कादंबरी म्हणजे एका व्यसनी तरुणाची शोकात्मक कथा आहे. हा तरुण या कादंबरीचा नायक असून त्याची दारूमुळे होणारी वाताहत लेखक या कादंबरीतून दाखवतात. या नायकाबरोबरच त्याची आई, बायको, मुलगा, वडील, सावत्रभाऊ राघव आणि वहिनी इ. मिळून त्याचे मध्यमवर्गीय कुटुंब लेखक चित्रित करतात. तसेच नरसू ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला लागल्यावर त्याची पैसे चोरी करण्याची सवय आणि या सवयीला प्रोत्साहन देणारी माई तसेच मित्रही या कादंबरीतून वाचकांचे विशेष लक्ष वेधतात. नायकाच्या व्यसनाला कंटाळून माहेरी निघून जाणारी त्याची बायको सुखदा व तिचा मुलगा त्यामुळे विसकटणारा त्यांचा संसार हे सर्व या कादंबरीतून आपण या प्रकरणात पाहिले.

तसेच या कादंबरीतून येणारा महानगरातील भ्रष्टाचार, गुन्हेगारी व्यवसाय, तेथील दारिद्र्यमय झोपडपट्टीचे जीवन याचा अभ्यासही आपण केला. या गुन्हेगारी जगताचे दर्शन लेखक अत्यंत वास्तवपूर्ण पध्दतीने घडवितात. त्यामुळे तिथला मटका व्यवसाय, दारूचा व्यवसाय इ. गुन्हेगारी क्षेत्र या कादंबरीतून येतात. तसेच पोलीस खाते, आरोग्य खाते, शिक्षण खाते, वीज विभाग आणि महानगरपालिका इ. क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे चित्रणही या कादंबरीतून येते. तसेच महानगरातील व्यसनी लोकांसाठी काम करणाऱ्या संस्थाचा आपण विचार केला. त्यात ' आल्कोहोलिक ॲनॅनिमस ' ही धार्मिक तर ' बेटर लॉइफ फॉर दि नॉर्कोटिक्स ' या समाजिक संस्थांचा समावेश प्रस्तुत कादंबरीतून लेखकाने केला आहे. याचा विचार आपण केला.

एक बाजूला श्रीमंती तर दुसऱ्या बाजूला वाढत जाणार दारिद्र्य जीवन या कथेतून दिसते. त्यामुळे तिथल्या लोकांना करावे लागणारे निरनिराळे व्यवसाय त्यात वेश्या व्यवसाय, चोरी, दरोडा, गुन्हेगारी प्रव्रुत्ती, त्यांचे गलिच्छ जीवन इ. सर्व प्रकारचे चित्रण लेखकाने या कादंबरीतून केले आहे. अशा या विविध आशयाच्या आधारे या कादंबरीचा अभ्यास या प्रकरणातून केला आहे. ही सर्व आशयसूत्रं या कादंबरीची वैशिष्ट्ये म्हणून येतात.

## संदर्भ ग्रंथ


| ग्रंथकार | | ग्रंथनाम |
|---|---|---|
| १. प्रभा गणोरकर आणि इतर | : | मराठी वाङ्मय संज्ञा - संकल्पना कोश<br>प्रका. जी.आर.भटकळ फाऊंडेशन, मुंबई.<br>आवृत्ती - प्रथम : डिसेंबर,२००१, पान-११७ |
| २. म.द.हातकणंगलेकर | : | ललित - मे,१९९९ : अंक - पाचवा, मुंबई.<br>पान-२२ |
| ३. सुमेध वडावाला (रिसबुड) | : | ' देह जावो अथवा जावो '<br>प्रका. नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.<br>आवृत्ती - प्रथम,२००५, पान - १९ |
| ४. तत्रैव | : | पान २७ |
| ५. तत्रैव | : | पान ३३ |
| ६. तत्रैव | : | पान ४४ |

| | | |
|---|---|---|
| ७. तत्रैव | : | पान १२८ |
| ८. तत्रैव | : | पान २९ |
| ९. तत्रैव | : | पान १५५ |
| १०. तत्रैव | : | पान ३० |
| ११. तत्रैव | : | पान ४४ |
| १२. तत्रैव | : | पान ४८ |
| १३. तत्रैव | : | पान ५५ |
| १४. तत्रैव | : | पान ८५ |
| १५. तत्रैव | : | पान ११२ |
| १६. तत्रैव | : | पान ११९ |
| १७. तत्रैव | : | पान २० |
| १८. तत्रैव | : | पान ३१ |
| १९. तत्रैव | : | पान ६२ |
| २०. तत्रैव | : | पान १२३ |
| २१. तत्रैव | : | पान १३४ |
| २२. तत्रैव | : | पान १८२ |
| २३. तत्रैव | : | पान २८ |
| २४. तत्रैव | : | पान ९८ |
| २५. तत्रैव | : | पान ८८ |
| २६. तत्रैव | : | पान १५५ |
| २७. तत्रैव | : | पान ४१ |
| २८. तत्रैव | : | पान ५८ |
| २९. तत्रैव | : | पान ८३ |
| ३०. तत्रैव | : | पान ९८ |
| ३१. तत्रैव | : | पान ४२ |
| ३२. तत्रैव | : | पान १२० |
| ३३. तत्रैव | : | पान १८३ |